**नियमित फौजदारी खटला क्र. १०/२०१७**
**निशाणी क्र. ५९.**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ ची जबानी.**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव -** अजिज चांदखाँ पठाण,
**वय -** ३४ वर्षे, धंदा - शेती,
**राहणार -** तळेगाव रोही, ता. चांदवड, जि. नाशिक.

---

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास श्री. एन. पी. मोरे वकिलांमार्फत शपथेवर सुरू :-**

१. दिनांक २१/०९/२०१६ रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान पाउस झालेला होता. त्यामुळे गट क्रं. २३६ च्या रस्त्यावर खड्डे झाले होते. सदरचे खड्डे रफिक चांदखाँ पठाण यांनी खड्डे दाबले होते. त्यावेळी आरोपींना गैरसमज झाला. त्यानंतर नवनाथ ठोंबरे यांनी रफीक पठाण याला रस्ता बंद केला या कारणारुन दगडाने डोक्यात मारहाण केली. त्यानंतर माझी आई बेबी पठाण समजविण्याकरीता आली त्यावेळी तिला डाव्या खांदयाला दगड लागला. माझ्या आईला मुक्का मार लागला व भावाला टाके पडले. त्यानंतर त्यांना चांदवड येथे वैद्यकिय उपचाराकरीता आणले. त्या ठिकाणी उपचार केला व त्यांना त्यानंतर नाशिक येथे नेले. ज्या दगडाने मारहाण केली होती तो दगड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला वस्तु - अ वरील दगड दाखविला. साक्षीदाराने तो ओळखला. तो तोच दगड आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज न्यायालय कक्षात दोन्ही आरोपी हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. एस. एम. सोनवणे वकिल यांच्यामार्फत सुरू :-**

२. माझे दहावी पर्यंत शिक्षण झाले आहे. पोलिसांनी २२ तारखेला माझा जबाब घेतला होता. मी ११ ते ११.३० वाजताच्या दरम्यान चांदवड येथे आईला व भावाला घेवून आलो होतो. चांदवडला आल्यानंतर पहिल्यांदा पोलिस स्टेशनला गेलो होतो. पोलिस स्टेशनमध्ये अर्धा तास थांबलो होतो. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात चांदवड येथे गेलो होतो. आम्ही रुग्णालयात गेलो त्यावेळी आमच्या सोबत मुस्ताक पठाण हजर होता. त्या ठिकाणी दिड ते दोन तास थांबलो. त्यानंतर आई व भावासोबत नाशिक येथे गेलो होतो. नाशिक येथे दोन ते तिन दिवस होतो. हे मला माहिती नाही की, रफिकचा पोलिसांनी जबाब नोंदवला होता किंवा कसे. मी ज्या रस्त्याबाबत सरतपासात सांगितले आहे त्या रस्त्याला कोणतेही नाव नाही. सदरचा रस्ता कुठूण कुठपर्यंत जातो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या व आरोपीच्या आईच्या मिळकतीच्या

मधून साळसाणे ते समीट रेल्वे स्टेशन रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आम्हांला आमचे शेतात जाण्याकरीता याच रस्त्याचा वापर होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता दगड माती टाकूण बंद केल्याबाबत आमचे परिवाराच्या विरुध्द आरोपींनी तहसीलदार चांदवड यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते. हे मला सांगता येणार नाही की, त्या प्रकरणावरुन तहसीलदार चांदवड मोक्यावर आले होते किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, तहसीलदारांनी आम्हांला सदरचा रस्ता वापरण्याकरीता खुला करुन देण्याकरीता आदेशीत केले होते किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, त्या प्रकरणात मी पक्षकार होतो किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावरुन आजही आम्ही व आरोपींमध्ये वाद सुरू आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींकडे या रस्त्याव्यतीरीक्त इतर दुसरा रस्ता उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता सुरू होता त्यावेळी आम्हांला आरोपीच्या हद्दीत व आरोपीला आमच्या हद्दीत येण्याचे कारण नव्हते.

३. पोलिसांना जबाब दिला त्यावेळी, "गट क्रं. २३६ च्या रस्त्यावर खड्डे झाले होते, सदरचे खड्डे रफिक चांदखाँ पठाण यांनी खड्डे दाबले होत" तसेच "त्यानंतर नवनाथ ठोंबरे यांनी रफीक पठाण याला रस्ता बंद केला या कारणारुन दगडाने डोक्यात मारहाण केली, त्यानंतर माझी आई बेबी पठाण समजविण्याकरीता आली" तसेच माझया आईला मुक्का मार लागला व भावाला "टाके पडले". या बाबी सांगितल्या होत्या. सदर बाबी माझे जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. अब्दूल चांदखाँ पठाण माझा भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो पूर्वीपासून राहण्याकरीता नागडे ता. येवला येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, एजाज शहबाज मुल्तानी हा अब्दूल पठाणचा नातेवाईक आहे. हे मला माहीती नाही की, एजाज मुल्तानी याने रफीक चांदखाँ पठाण याच्याकडून गाय खरेदी केली होती किंवा कसे. हे मला माहीती नाही की, तो टेंपोतून गाय घेवून जात होता किंवा कसे. हे मला माहीती नाही की, आरोपी नवनाथ याने पोलिस पाटलाला सांगून तो टेंपो पकडून दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, त्याकारणावरुन मी व माझया भावाला आरोपीविषयी राग होता.

५. मी सरतपासात सांगितलेली घटना अंदाजे अर्धा तास चालली होती. त्यावेळी त्या ठिकाणी पाच ते दहा लोक जमा झाले होते. त्यावेळी नवनाथ भोकनळ, तुकाराम सोमवंशी, सोमनाथ भोकनळ हजर होते. इतर लोकांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगतो तशी कोणतीही घटना त्या दिवशी घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा कथन केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी पाउस आला होता व मोटर सायकल रस्त्यावर घसरली व पडून आम्हांला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर लागलेला माराचा गैरफायदा घेवून आरोपींना धडा शिकविण्याकरीता खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी घटनास्थळ हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु अ वरील दगड मी व माझया भावाने पोलिसांना दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, भाउ व आईच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.** श्रवणोत्तर स्विकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.25 18:48:49 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदवड.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.25 18:48:56 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदवड.**

**दिनांक : २५/०८/२०२५**